ज्याने आपल्या बंधुचा सन्मान प्रतिष्ठा किंवा तत्सम बाबतीत अपमान केला असेल तर त्याला पाहिजे की त्याने आजच आपली सुटका करून घ्यावी, तो दिवस उजाडण्या पहिले ज्या दिवसी न दिणार कामा येईल ना दिरहम

अबुहुरैरा रजिअल्लाहु अनहु वर्णन करतात की प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व
सल्लम नी फरमाविले की: <>. [صحيح] [رواه البخاري]

प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैही व सल्लम नी आदेश दिला आहे की ज्याने कुणी आपल्या मुसलमान बंधु चे सन्मान प्रतिष्ठा संपत्ती, व जिवा बाबत अन्याय झाला असेल तर त्याने याच जगात आपल्या बंधुची क्षमा मागावी, कारण अंतिम दिवसी ना सोन्याचे दिरहम ना चांदीचे दिणार कामी पडणार जे देउन त्याची सुटका होईल, त्या दिवसी बदला सत्कर्म व गुनाह म्हणजे दुष्कर्म द्वारा घेतल्या जाईल, मग अत्याचारग्रस्त आपल्यावरील अत्याचाराच्या मोबदल्यात अत्याचारी व्यक्ती ची सत्कर्मातुन हिस्सा घेईल, जर अत्याचारी जवळ सत्कर्म नसतील तर मजलुम म्हणजे अत्याचारग्रस्त ची पापं अन्यायी माणसाच्या माथी तेवढा हिस्सा टाकण्यात येईल जेवढे त्याने जुलुम केला असेल.

http://www.sunnah.global/hadeeth/mr/show/5438